# महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण.मुक्काम पुणे

**मा.म.पोतदार-सदस्य (न्यायीक)**

---

**प्रकरण क्र. TNC/REV/37/2002/NS.** **निर्णय दि. २६/४/२०२२.**

नारायण संभाजी भोसले (म.वा.)
१A) सुरेश नारायण भोसले व इतर,
मु- निकमवाडी, पो- जांब, ता-वाई, जि- सातारा. } रिव्हिजन अर्जदार

विरुध्द

ज्ञानेश्वर केशव सुतार (म.वा.)
१)श्री घनश्याम ज्ञानेश्वर सुतार व इतर.
रा- ६७६, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे. } रिव्हिजन जाबदार

**मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम**
**कलम ७६ नुसार पुनरीक्षण अर्ज.**

रिव्हिजन अर्जदारातर्फे ॲड. विठ्ठलराव डी. विरकर.
रिव्हिजन जाबदारातर्फे ॲड. जे.एम.पाटील.

## न्यायनिर्णय

**( दि.२६/४/२०२२ )**

१) उपविभागीय अधिकारी वाई यांनी आर.टी.एस./अ ११/९८ मध्ये दि-७/२/२००२ रोजी निर्णय देऊन अप्पर तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वाई यांचा टे.के.नं.३२ ग/जांब १/ ९६ मधील दि-१६/१/१९९८ रोजीचा निर्णय कायम करुन अपील फेटाळले त्या निर्णयावर नाराज होऊन त्या अपिलातील पक्षकारा व्यतिरिक्त इतरांनी प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज दाखल केला आहे.

२) या प्रकरणातील हकीगत अशी की, :--

अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण वाई यांच्यासमोर कुळकायदा कलम ३२ ग (ह)/ जांब/१/१९९६ ही टेनन्सी केस संभू बाळा भोसले (म.वा.) परमेश्वर संभू भोसले आणि ज्ञानेश्वर केशव सुतार यांच्यामध्ये चालली होती. त्या प्रकरणात भोसले हा कूळ होता तर सुतार हा जमीनमालक होता.

वादातील जमीन मौजे जांब , ता-वाई येथील स.नं.१२६/१ चा नवीन गट नं.५९१ क्षेत्र ० हे. २५ आर ही होती. दि-७/१२/१९९६ रोजी वरील जमिनीची कुळकायदा कलम ३२ ग नुसार किंमत ठरवून मिळावी म्हणून कुळाने अर्ज केला होता. त्या अर्जाप्रमाणे दि-१६/१/१९९८ रोजी निर्णय देऊन वाद जमिनीची किंमत ठरविण्याचा आदेश अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांनी केला. त्या आदेशाविरुध्द जमीन मालक ज्ञानेश्वर केशव सुतार याने उपविभागीय अधिकारी वाई यांच्याकडे अपील क्र.११/१९९८ हे दाखल केले. दि-७/२/२००२ रोजी त्याचा निर्णय होऊन उपविभागीय अधिकारी यांनी ते अपील फेटाळून लावले.

त्या अपीलाविरुध्द नारायण संभू ऊर्फ संभाजी भोसले की जो संभू बाळा भोसले याचा मुलगा आहे असे सांगतो त्याने त्या निर्णयाविरुध्द प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज दाखल केला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे तो व त्याचे इतर भाऊ यांनी या प्रकरणात ति-हाईत पक्षकार म्हणून सामील करुन घ्यावे यासाठी दि-२८/९/१९९८ रोजी अर्ज केला होता त्या अर्जावर निर्णय न होताच अपीलाचा निकाल झाला असल्याने त्यांना या न्यायाधिकरणासमोर दाद मागावी लागली आहे.

३) पुनरीक्षण अर्जदार व जाबदार नं.२ यांनी दाखल केलेला लेखी युक्तीवाद वाचला आहे. पुनरीक्षण अर्जदारांच्या वतीने ना.सर्वोच्च न्यायालय व ना.उच्च न्यायालय मुंबई यांच्या पुढे नमूद केलेल्या निर्णयांचा आधार घेण्यात आला आहे. **१) हरविंदर सिंग वि. परमजित सिंग आणि इतर , २०१३ ऑल एमआर ९४६ (एस सी), २) राजाराम महादू दहातोंडे (म.वा.) व इतर वि. बाबु महादू दहातोंडे आणि इतर. २०१६ (२)ऑल एमआर पान नं.३२६, ३) सरोजिनी चंद्रकांत तिरनेकर वि. श्रीमती यमुनाबाई सोपान झोल आणि इतर, २००७ (३) एआयआर बॉम्बे आर पान नं.६०५, ४) सर्जेराव मारुती साठे वि. प्रल्हाद लक्ष्मण साठे आणि इतर. २०१० (२) ऑल एम. आर. पान नं.५४४.**
हे निर्णय मी वाचून पाहिले आहेत.

४) या प्राप्त परिस्थितीमध्ये , "उपविभागीय अधिकारी वाई यांनी आर.टी.एस./अ ११/९८ मध्ये दि-७/२/२००२ रोजी, अपील फेटाळण्याचा जो निर्णय दिला आहे तो योग्य , बरोबर व कायदेशीर आहे काय ? आणि त्यामध्ये या न्यायाधिकरणाकडून हस्तक्षेपाची आवश्यकता आहे काय? हे मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात ?

५) या प्रकरणामध्ये तहसिलदार वाई यांना या न्यायाधिकरणाकडून वारंवार लेखी सूचना देऊनही त्यांनी त्यांच्याकडील संचिका या न्यायाधिकरणाकडे पाठविली नाही. जिल्हाधिकारी सातारा यांना कळऊन संचिका उपलब्ध करुन देण्याविषयी कळविले असता जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांच्याकडून अपेक्षेप्रमाणे पाठपुरावा झाला नाही. त्यांच्याकडून फक्त " पोस्टमन " चे काम केले गेले. त्याचप्रमाणे वाई तहसिल कार्यालयातील संचिका सांभाळणारा कर्मचारी उध्दट व उर्मट वर्तणूक करतो याबद्दलची तक्रार देखील जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे केली होती त्याबाबत देखील त्यांनी किंवा तहसिलदार वाई यांनी पाठपुरावा केला नाही. त्यामुळे या प्रकरणात तहसिल कार्यालयाकडून वारंवार पाठपुरावा करुनही संचिका उपलब्ध होणार नाही हे निदर्शनास आल्याने उपविभागीय अधिकारी वाई यांच्याकडून आलेली संचिका वाचून पाहून प्रकरणामध्ये निर्णय देण्याचे ठरविले आहे.

६) प्रस्तुतच्या पुनरीक्षण अर्जामध्ये पुनरीक्षण अर्जासोबत तहसिलदार वाई यांनी जो प्रश्नाधीन निर्णय दिलेला होता त्याची सहीशिक्याची नक्कल पुनरीक्षण अर्जासोबत हजर करावी लागते हे पुनरीक्षण अर्जदारांच्या वकीलांना माहिती असूनही हजर केलेली नसल्याने उपविभागीय अधिकारी वाई यांच्या संचिकेतील तहसिलदार वाई यांचा निर्णय वाचून पाहिला. त्या निर्णयावरुन असे दिसून येते की, तहसिलदार वाई यांनी निर्णय देत असतांना झेरॉक्स प्रती वाचून, अर्जदार व जाबदार यांचा शपथेवर पुरावा न नोंदविताच निर्णय दिल्याचे दिसते. कुळकायदा कलम ३२ ग प्रमाणे जमीनीची किंमत ठरवित असतांना ती किंमत कशा पध्दतीने ठरवावी, कोणा कोणाला चौकशीच्या नोटीसा काढाव्यात, कोणा कोणाचे जबाब नोंदवावेत याची सविस्तर कार्यपध्दती मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील प्रकरण "सहा" , कुळकायदा कलम ३२ ग आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मध्ये जी नियमावली दिलेली आहे त्यातील नियम क्र. १७ व १७अ मध्ये केलेली आहे. या तरतूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन वाद जमिनीची किंमत ठरविली किंवा कसे हे प्रश्नाधीन निर्णयावरुन दिसून येत नाही.

७) उपविभागीय अधिकारी वाई यांनी या प्रकरणातील अपील हे आरटीएस अपील समजून निर्णय दिल्याचे दिसते. टेनन्सी अपील व आरटीएस अपील या दोन्हीमध्ये खूप फरक आहे. प्रकरणातील अपील हे वास्तविक टेनन्सी अपील आहे. आरटीएस अपील आणि टेनन्सी अपील यातील फरकाची माहिती उपविभागीय अधिकारी यांना नसावी याचे आश्चर्य वाटते. तरी देखील या न्यायाधिकरणाने ते आरटीएस अपीला ऐवजी टेनन्सी अपीलच गृहीत धरले आहे.

८)    उपविभागीय अधिकारी यांची संचिका वाचून पाहाता त्यामध्ये पान नं.४९ वर ति-हाईत इसम की जे मूळ कूळ संभू ऊर्फ संभाजी बाळा भोसले याची नात्याने मुले आहेत म्हणजेच त्यातील जाबदार परमेश्वर याचे भाऊ आहेत, अशांनी त्यांना या अपिलामध्ये सामील करुन घ्यावे म्हणून दि-२८/९/१९९८ रोजी अर्ज दिल्याचे दिसते. त्या अर्जावर स्वतंत्रपणे निर्णय न देता उपविभागीय अधिकारी यांनी, " वाद मिळकतीबाबत वारसाहक्क अथवा कुटुंब व्यवस्था यासाठी त्यांनी वेगळा दावा दाखल करावा , या अपिलामध्ये त्यांना भाग घेता येणार नाही असे माझे मत आहे," असे निरीक्षण नोंदविल्याचे दिसते. सदरचे निरीक्षण हे चुकीचे, अयोग्य व बेकायदेशीर आहे कारण मूळ प्रकरण हे संभू बाळा भोसले विरुध्द ज्ञानेश्वर केशव सुतार यांच्यामध्ये चालले होते. त्या प्रकरणात संभू बाळाचा मुलगा परमेश्वर याने मयताचा वारस म्हणून एकटयाने प्रकरण चालविल्याचे दिसते. हणमंत संभाजी भोसले, नारायण संभाजी भोसले ( हल्लीचा पुनरीक्षण अर्जदार ) व भगवान संभाजी भोसले यांच्या म्हणण्यानुसार ते परमेश्वर संभाजी भोसले याचे भाऊ आहेत म्हणजेच मूळ मयत कूळ संभू ऊर्फ संभाजी बाळाजी भोसले याची मुले आहेत. कुळकायदा कलम ४० चा विचार केला असता कुळाचे वारस हे कूळ ठरु शकतात. जर त्यांच्या मध्ये कूळ हक्काचा वाद असेल तर त्यामध्ये तहसिलदार हे चौकशी न्यायाधिकरण म्हणून लेखी, तोंडी पुरावा नोंदऊन योग्य तो निर्णय देऊ शकतात त्यासाठी कुळाच्या वारसांनी वेगळा दावा करण्याची गरज नसते. कुळकायदा कलम ३२ ग नुसार वाद जमिनीची किंमत ठरवित असताना त्या जमिनीमध्ये जर काही इतर व्यक्तींचे हितसंबंध गुंतले असतील तर त्यांना नोटीसा काढून त्यांचे देखील म्हणणे ऐकून घ्यावे लागते ही कायदयाची बाब विचारात घेतली तर ति-हाईत इसम म्हणून हल्लीचा पुनरीक्षण अर्जदार व त्यांचे भाऊ यांचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय देण्यास कोणतीही अडचण नव्हती. ही बाब उपविभागीय अधिकारी यांनी लक्षात घेतली नसल्याने त्यांचा निर्णय सकृतदर्शनीच चुकीचा व बेकायदेशीर ठरतो. वर नमूद केल्याप्रमाणे अप्पर तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वाई यांनी , त्यांच्या निकालपत्रावरुन, जमीन मालक व कूळ या दोघांचे शपथेवर जाब जबाब नोंदविल्याचे दिसून येत नाही त्यामुळे त्यांचा निर्णय देखील चुकीचा व बेकायदेशीर ठरतो. थोडक्यात अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण वाई व उपविभागीय अधिकारी वाई यांनी कायदेशीर बाबींचा विचार न करता निर्णय दिला असल्याने दोघांचेही आदेश चुकीचे, अयोग्य व बेकायदेशीर असल्याने ते रद्द करुन प्रकरण फेरचौकशीसाठी पाठवावे हे योग्य व न्याय वाटल्याने खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश.

१)    प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज खालील अटीवर अंशत: मंजूर करण्यात आला आहे:-

अ) उपविभागीय अधिकारी वाई यांनी आर.टी.एस./अ ११/९८ मध्ये दि-७/२/२००२ रोजी दिलेला निर्णय व अप्पर तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वाई यांनी टे.के.नं.३२ ग/जांब १/ ९६ मध्ये दि-१६/१/१९९८ रोजी दिलेला निर्णय असे दोन्हीही निर्णय रद्द करण्यांत येत आहे.

ब) प्रकरण फेरचौकशीसाठी अप्पर तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वाई यांच्याकडे पाठविणेत येत आहे. त्यांना निर्देश देण्यात येतात की, त्यांनी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील प्रकरण " सहा " नुसार म्हणजे दोन्ही बाजूंचे शपथेवर जाब - जबाब नोंदवावेत, दोन्ही पक्षकारांना एकमेकांचा उलट-तपास घेण्याची संधी दयावी, साक्षीदार तपासण्याची संधी दयावी, लेखी तोंडी युक्तीवादाची संधी दयावी, स्वत: मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ म्हणजेच सुधारीत महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ हा कायदा त्या अंतर्गत असलेले नियम व सदरचे प्रकरण हाताळतानां आवश्यक असणारे संबंधीत कायदे स्वत: वाचावेत त्याचा अभ्यास करावा आणि स्वत:ची न्यायबुध्दी वापरुन कायदयाला अभिप्रेत असणारा न्यायनिर्णय दयावा. सदरचे काम हाताखालील कर्मचारी, कारकून, कोतवाल, तलाठी, मंडलाधिकारी यांच्यावर सोपवू नये. ते काम स्वत: करावे तसेच संबंधित वकीलांना असेही निर्देश देण्यात येतात की, ज्या तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरणासमोर सदरचे प्रकरण चालणार आहे त्यांना सदरचा आदेश समक्ष वाचून दाखवून अवगत करावा व या निकालपत्रामध्ये नोंदविलेल्या निरीक्षणाप्रमाणेच काम चालेल हे पाहावे.

२) या निर्णयाची एक प्रत अप्पर तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वाई व उपविभागीय अधिकारी वाई यांना पाठवावी.

३) या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी सातारा यांना अलाहिदा पत्राने पाठवून संचिकेबद्दल कळवावे.

४) खर्चाविषयी आदेश नाहीत.

५) सदरचा निर्णय संबंधित पक्षकारांना कळवावा.

६) अप्पर तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वाई यांच्याकडून प्रकरणाची संचिका आलेली नाही. उपविभागीय अधिकारी वाई यांचेकडील प्राप्त संचिका परत पाठवून दयावी.

२६/४/२०२२

दि:- २६/४/२०२२.
मुक्काम पुणे

(मा.म. पोतदार)
सदस्य (न्यायीक)
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण.